विनाअनुदान तत्वावर

जा.क्र.प्रा./प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि /१०५
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे - १ यांचे कार्यालय.
दिनांक :- 7 JUN 2004

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.

~~शिक्षण प्रमुख/प्रशासन अधिकारी,~~
~~महानगरपालिका/नगरपालिका शिक्षण मंडळ,~~

विषय :- सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळांना देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करुन सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षात परवानगी देणेबाबत. (माध्यम - मराठी ).

संदर्भ :- शालेय शिक्षण विभागाकडील
१. क्रमांक-पीएलएस/ १०००/[५५७/२०००][१]प्राशि-२
दिनांक - १९/७/२००१
२. क्रमांक-पीएलएस-१००१/(--/२००१)/प्राशि-३,
दिनांक - ८/१०/२००२
या कार्यालयाकडील
३. प्र/प्राशि/खाप्राशा/नूतनीकरण/पुवि/२००१/११४७,
दिनांक - २४ जुलै, २००१.
४. ---"----- १०/१२/२००२

उपरोक्त विषयासंबंधीची आपल्या कार्यालयास पृष्ठांकित केलेली शासनाकडील व या कार्यालयाकडून दिलेली संदर्भाधिन पत्रे कृपया अवलोकनी घ्यावीत.

आपणास कळविण्यात येते की, स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमुद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून,२००० पासून इयत्ता १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीस) सन २०००-०१ या शैक्षणिक वर्षात देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करुन जून,२००१ पासून सन २००१-०२ या शैक्षणिक वर्षात ~~कायम विनाअनुदान~~ शाळा सुरु करण्यास खाली नमुद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर विनाअनुदान तत्वावर / ~~~~ परवानगी देण्यात येत आहे. ~~~~

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नांव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १] | श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था, पुणे. विना अनुदान | बारव ,ता-जुन्नर, जि-पुणे | १ ली च्या वर्गास फक्त | मराठी |

सदर परवानगी खालील अटी व शर्तीवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था, नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहिजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणाकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहिजे.

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्याप्रमाणे शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेणी व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

कृपया मागे पहा

३.४ संस्थेनी आर्थिक परिस्थिती, संस्थेकडील भौतिक सुविधा, व्यवस्थापनविषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य करणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे. तसेच अध्यापन, पाठ्यपुस्तके, मूल्यमापन पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य नियोजन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधा पुरविल्या पाहिजेत.

३.६ संस्थेने शाळेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित सोयसुविधा अद्ययावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच जबाबदारीपणा, निर्भयतापणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे..

३.८ संस्थेने परवानगीसाठी विहित केलेले माध्यम, शाळेची जागा इत्यादी बाबी भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे..

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

सदर परवानगी पत्र प्राप्त झाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने ही परवानगी संबंधित शैक्षणिक संस्थेच्या व्यवस्थापनाच्या निदर्शनास तात्काळ आणावी. सदरची बाब संस्थेच्या निदर्शनास आणल्यानंतर संस्थेने परवानगी मिळालेल्या माध्यमातून व ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु करणे आवश्यक आहे. अशा संस्थेने तद्नंतर सक्षम प्राधिकाऱ्याकडे (आपणाकडे) रीतसर प्राथमिक शाळा मान्यतेसाठी अर्ज करावा, असा अर्ज मिळाल्यानंतर सक्षम प्राधिकाऱ्याने शाळेची तपासणी करुन तपासणी अहवाल शिक्षण मंडळ/शिक्षण समिती यांचेकडे मान्यतेसाठी सादर करावा व शाळेच्या मान्यतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी. शिक्षण मंडळ/शिक्षण समितीची मान्यता मिळताच त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे.

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे - १

प्रत माहितीसाठी अग्रेषित सादर:
१. मा. [illegible] महाराष्ट्र शासन, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे - १
३. शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, [illegible]
मा. [illegible]

श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था, पुणे.

~~कायम विनाअनुदानित~~

विना अनुदानित

पुणे जिल्हा परिषद, पुणे
"यशवंतराव चव्हाण भवन"
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र. जिप/शिक्षण/प्राथं/२/२१/८३५/२००४

पुणे दिनांक :- ९ /७ /२००४

प्रति,

गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती जुन्नर जि. पुणे

विषय :- सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात नविन खाजगी प्राथमिक शाळांना देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करून सन-२००१-२००२ या शैक्षणिक वर्षात परवानगी देणे बाबत. (मराठी)

संदर्भ :- १] शासनाकडील शिक्षण सेवायोजन विभाग पत्र क्रमांक-व्हीएलएस/१०००/[५५७/२०००]/[१]/प्राशि-३, दि-१८/७/२००१
२] शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे यांचे पत्र जा.क्र. प्रा/प्राशि खाप्राशा/मान्यता/पुवि/१०५/ १३९४७/५४ /२००४ दि-७/६/२००४

उपरोक्त विषयानुसार महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग व सेवा योजन विभाग यांनी स्थानिक गरज लक्षात घेऊन खाली नमूद केलेल्या संस्थेला तिच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी व माध्यमातून जून, २००० पासून इयत्ता १ ली च्या वर्गास (फक्त एका तुकडीत) सन-२०००-२००१ या शैक्षणिक वर्षात देण्यात आलेल्या परवानगीचे नूतनीकरण करून जून, २००१ पासून सन-२००१-२००२ या शैक्षणिक वर्षात ~~प्रत्यक्ष सुरु असलेल्या वर्गासह~~ शाळा सुरु करण्यास खाली नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्याच्या शर्तीवर "विनाअनुदानतत्वावर/~~कायम विनाअनुदान तत्वावर~~" ~~"कायम बंद"~~ म्हणून परवानगी देण्यात येत आहे. ~~यापुढे माध्यमाच्या खाजगी प्राथमिक शाळांना/कायम विनाअनुदानित तत्वावर तसेच भविष्यात शासन अनुदान देणार नाही~~/या अटींवर परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे नाव व ठिकाण | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १) | श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था, पुणे | बारव ता. जुन्नर जि. पुणे | इ. १ लीच्या वर्गास फक्त | मराठी |

सदर परवानगी खालील शर्ती व अटींवर अवलंबून आहे. त्याचा भंग झाल्यास परवानगी रद्द होईल.

३.१ सदर संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असली पाहीजे.

३.२ शाळेची इमारत व परिसर शिक्षणानुकूल, स्वच्छ व सुरक्षित असला पाहीजे

३.३ शाळेत शासनाने वेळोवेळी विहित केल्यानुसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हतेचा आवश्यक सक्षम कर्मचारीवृंद शासनाने वेळोवेळी विहीत केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.

३.४ संस्थेची आर्थिक परिस्थिती, संस्थेतील भौतिक सुविधा, व्यवस्थापन विषयक सुविधा इत्यादी शाळा व्यवस्थित चालण्यासाठी सुयोग्य असणे आवश्यक आहे.

३.५ संस्थेने या शाळेमध्ये शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमांची अंमलबजावणी केली पाहीजे. तसेच अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके, मूल्यमापण पध्दती, शालेय व सहशालेय कार्यक्रम आणि उपक्रम यांचे सुयोग्य कार्यान्वयन केले पाहिजे व त्यासाठी आवश्यक सर्व सुविधापुरविल्या पाहि

३.६ संस्थेने शालेतील विद्यार्थ्यांसाठी/कर्मचाऱ्यांसाठी विहित नोंदवह्या अद्यावत आणि विश्वासार्ह स्वरुपात कार्यान्वित ठेवल्या पाहिजेत.

३.७ संस्थेने शाळेतील वातावरण शिक्षणानुकूल ठेवणे आवश्यक आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये विधायक शिस्त निर्माण करणे, तसेच सत्तशिलपणा, नियमितपणा आणि नियमित उपस्थिती या गोष्टी त्यांच्यावर बिंबवणे आवश्यक आहे.

३.८ संस्थेने परवानगीसाठी दिलेले केलेले प्रस्ताव, शाळेची जागा बदलण्याची, मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.

३.९ संस्थेने शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे, नियमांचे पालन करणे आवश्यक आहे.

३.१० संस्थेने विद्यार्थ्यांना शाळेत प्रवेश देतांना परिसरातील इतर मान्यताप्राप्त प्राथमिक शाळांवर विपरीत परिणाम होणार नाही, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.

३.११ शासनाने ज्या ठिकाणासाठी परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणी प्राथमिक शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.

३.१२ शासनाने परवानगी दिलेल्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षी नुतनीकरणासाठी अर्ज सक्षम अधिकाऱ्यांकडे परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षात करणे बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

---

ही परवानगी देण्यापुर्वी संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची पुन्हा खात्री करुन घेऊन मगच संस्थेला खाजगी शाळेची मान्यता देणे बाबत. कार्यवाही करण्यात यावी.

१. संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व महाराष्ट्र विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी किंवा केवळ महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

२. संस्थे विरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.

३. सदर संस्थेने चालविलेल्या प्राथ. शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४. संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार चालत असल्याबाबत तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

६. संस्थेने विहित नमुण्यात शुल्कअर्ज केला आहे. [यापूर्वी अर्ज केला नसल्यास तो करुन घ्यावा]

७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रुपये १०८/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

तरी या बाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल त्वरीत या कार्यालयात पाठवावा.

शिक्षणाधिकारी [प्राथमिक]
जिल्हा परिषद, पुणे-१

प्रत:- १. मुख्याध्यापक ~~खाजगी प्राथमिक शाळा बारव ता. जुन्नर जि. पुणे~~
२. सचिव, ~~श्री शिवाजी मराठा शिक्षण संस्था पुणे~~
३. विस्तार अधिकारी, [शिक्षण] यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस. सदर शाळेची वार्षिक तपासणी होऊन अहवालाची एक प्रत इकडे न चुकता पाठविण्याची दक्षता घ्यावी.

२२२०९१४२

जाक्रमा./प्राशि/खाप्राशा-नुमा/पुति/०५
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक :

13 OCT 2005

प्रति

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे

विषय : मान्यताप्राप्त विनाअनुदानित/अनुदानित खाजगी प्राथमिक शाळांमधील नैसर्गिक वाढीचे प्रथम वर्ग मंजूरीबाबत.

संदर्भ : मा. शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रमांक प्राशान्या-१६०५(३४८/०५),प्राशि-३, दि. ८ जुलै २००५

उपरोक्त विषयाबाबत सन २००४-०५ या शैक्षणिक वर्षामध्ये प्राप्त झालेल्या प्रस्तावाची पडताळणी केली असता, खाली नमूद केलेल्या शाळेस संदर्भाधिन शासन निर्णयाच्या अनुषंगाने खालील अटींच्या अधिन राहून नैसर्गिक वाढीच्या प्रथम वर्गास विनाअनुदान तत्वावर मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शाळेचे नांव | माध्यम | क्षेत्र | इयत्ता | मंजूरी वर्ष |
|---|---|---|---|---|---|
| १. | प्राथमिक विद्यामंदिर बारव ता. जुन्नर | मराठी | जि.प. | २ री | २००१ |
| | | | | ३ री | २००२ |
| | | | | ४ थी | २००३ |
| २. | प्रतिभाताई पवार प्रशाला, ओतुर, ता. जुन्नर | मराठी | जि.प. | ४ थी | २००३ |

१. नैसर्गिक वाढीचे वर्ग शासन निर्णय दि. २.१२.१९९६ मध्ये नमूद केलेल्या अटींची पुर्तता करण्यात यावी.

२. सदर शाळांतील प्रथम वर्गास मंजूरी देण्यात आलेली आहे. त्या वर्गास शासन निर्णय क्रमांक व्हीलएलएस-१०००/(२४५५)/प्राशि-१, दि. ८.११.२००० मध्ये नमूद केलेले सूत्र लागू होईल.

सदर शाळांना वर्ग मंजूरी आदेश आपण आपले स्तरावरुन तात्काळ निर्गमित करण्यात यावेत.

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे- . यांचे कार्यालय
13 OCT 2005
आवक क्रमांक

स्थळप्रतीवर मा. शिउसं यांची सही आहे.

२४१९०
K९५१

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१.करिता

१. मुख्याध्यापक, प्राथमिक विद्यामंदिर, बारव, ता. जुन्नर, जि. पुणे
२. मुख्याध्यापक, प्रतिभाताई पवार प्रशाला, ओतुर, ता. जुन्नर, जि. पुणे
३. मा. शिक्षण संचालक (प्राथमिक),
प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१.

२१२०९

C0009/B

जा.क्र.प्रा/प्राशि/खाप्राशा-मान्यता/पुवि/
शिक्षण उपसंचालक ,
पुणे विभाग , पुणे १ यांचे कार्यालय,
दिनांक / / - 1 APR 2011

प्रति ,

शिक्षणाधिकारी ( प्राथमिक )
जिल्हा परिषद , पुणे

**विषय :- मान्यताप्राप्त खाजगी अनुदानित / विनाअनुदानित प्राथमिक शाळातील नैसर्गिक वाढीच्या / वाढीव तुकडयांना मंजूरी देणेबाबत.**

संदर्भ :- १. शालेय शिक्षण विभागाकडील शासन निर्णय क्रं. प्राशातु ११११०/(९००/२०१०) / प्राशि ३ , दिनांक १०/१२/२०१०.
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालनालय यांच्याकडील क्रं. खाप्राशा/नै.तु.वाढ /२००९/ड ५१२/अ/९७८ दिनांक २४/१/२०११ रोजीचे पत्र

उपरोक्त विषयाबाबत आपल्या कार्यालयाकडून या कार्यालयास प्राप्त झालेल्या प्रस्तावास उपरोक्त संदर्भाधीन पत्रान्वये खाली नमूद केलेल्या शाळेच्या नैसर्गिक वाढीच्या वर्गास विनाअनुदान तत्वावर मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार सदर शाळेस खालील अटीच्या अधिन राहून वर्गास मंजूरी देण्यात येत आहे.

| अ. क्र. | संस्थेचे शाळेचे नांव | माध्यम | मंजूर करावयाची तुकडी / वर्ग | मंजूर करावयाचे वर्ष | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. शिवाजी मराठी शिक्षण संस्था ( शिवनेर ) जुन्नर संचलित , प्राथमिक विदयामंदिर , बारव , ता. जुन्नर , जि. पुणे | मराठी | इयत्ता ५ वी ( प्रथम ) | २००७-०८ पासून | विना अनुदान तत्वावर |

१.शासनाच्या त्या त्या वेळी प्रचलीत असलेल्या अनुदानाच्या धोरणाप्रमाणे त्या तुकडयांना अनुदान देय राहील.
२. मूल्याकंनानुसार पात्र झाल्यानंतरच या तुकडयांना शासनाच्या त्या त्या वेळी प्रचलीत असलेल्या अनुदानाच्या धोरणाप्रमाणे त्या तुकडयांना अनुदान देय राहील.
३. अनुदान मंजूर होणे हा संस्थेचा हक्क राहणार नाही. अनुदानाच्या उपलब्धतेनुसारच अनुदान देण्यात येईल.
४. मान्यता दिलेल्या उपरोक्त वर्ग / तुकडयांची किमान विदयार्थी पटसंख्या व हजरेसंख्या टिकविण्यात यावी.
५. पटसंख्या अथवा हजरेसंख्या कमी असल्यास तो वर्ग / तुकडी अनुदानासाठी पात्र ठरणार नाही.
६. सदर परिपत्रकातील नैसर्गिक वाढीचे वर्ग / अतिरिक्त तुकडयांना मंजूरी देतेवेळी प्राथमिक शाळांना सदरील नैसर्गिक वाढीच्या वर्गांची / अतिरिक्त तुकडयांची खरोखरच गरज आहे किंवा कसे याची खातरजमा करून त्यानंतरच सदर वर्ग / तुकडया मंजूर कराव्यात.

( कुऱ्हाडे सु. जं. )
शिक्षण उपसंचालक ,
पुणे विभाग , पुणे १.करिता

स्थळप्रतीवर मा. शि. उ. सं. यांची सही असे.

प्रत माहितीस्तव सादर.
१.मुख्याध्यापक , प्राथमिक विदयामंदिर , बारव , ता. जुन्नर , जि. पुणे
२.मा.शिक्षण संचालक ( प्राथमिक ) , प्राथमिक शिक्षण संचालनालय , महाराष्ट्र राज्य , पुणे -१

**कायम विना अनुदान तत्त्वावर**
(मराठी, हिंदी, उर्दू ,इंग्रजी तामिळ इत्यादी माध्यम)

**पुणे जिल्हा परिषद, पुणे**
यशवतराव चव्हाण भवन
शिक्षण विभाग (प्राथमिक)
जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्रशा/७८९/२०११
पुणे १ दिनांक:- २२/ ११ /२०११

**प्रति,**

**मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका**

**विषय:-** कायम / विना अनुदान तत्त्वावरील शासन मान्यता प्राप्त खाजगी प्राथमिक शाळांना ज्यादा/**नैसर्गिक वाढीचा**/वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग उघडण्यास परवानगी देणेबाबत.

**संदर्भ :-** शासन निर्णय क्रमांक व्हीएलएस १००२/(१०००/०२)/प्राशि -३ दि.२३ सप्टेंबर २००३

उपरोक्त विषयासंबधीचा आपणाकडून प्राप्त झालेला प्रसताव विचारात घेता खालील नमूद केलेल्या शाळेस त्यांच्या नावासमोर दर्शविण्यात आलेल्या **जादा/नैसर्गिक वाढीचा** /वाढीच्या प्रथम/जादा तुकडया/वर्ग **६वी जून२००८, ७ वी जून २००९** , या शैक्षणिक वर्षापासून खाली दर्शविण्यात आलेल्या अटी शर्तीच्या अधिन राहून मंजूर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | माध्यम | इयत्ता | तुकडी वाढ जादा/नैसर्गिक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था (शिवनेर) प्राथमिक विदया मंदीर बारव ता. जुन्नर, जिल्हा पुणे | **मराठी** | **इ. ६ वी**<br>**इ. ७ वी** | **नैसर्गिक तुकडी वाढ** | **विना अनुदान तत्वावर मंजूर** |

**अटी व शर्ती**

१. शाळेस शासनाने वेळोवेळी विहित केल्यानूसार शैक्षणिक व व्यावसायिक अर्हततेचा व आवश्यक सक्षम कर्मचारी वृंद शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या वेतनश्रेण्या व सेवाशर्तीच्या अधिन राहून नेमला पाहिजे.
२. सदर शाळेने तुकडयासाठी सर्व भौतिक सुविधा तसेच शैक्षणिक व्यवस्थापन विषयक सुविधा उपलब्ध करुन नेमला पाहिजे.
३. सदर शाळेस स्वच्छतागृहाची व पिण्याच्या पाण्याची सोय चांगली असावयास हवी.
४. शाळेने शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या अभ्यासक्रमाची अंमलबजावणी केली पाहिजे.
५. सदर मंजूर करण्यात येणा-या तुकडी मुळे परिसरातील इतर मान्यता प्राप्त प्राथमिक शाळेच्या पटावर विपरीत परिणाम होणार नाही याची खबरदारी घेणे आवश्यक आहे.
६. सदर शाळेच्या वर्गास/तुकडीस विद्यार्थीसंख्या पुरेशी असणे आवश्यक आहे.
७. तपासणी अंती एक जरी अट नियमबाहय असलेची निदर्शनास आल्यास तुकडी/वर्ग मान्यता रद्द करण्यात येईल.
८. पट व उपस्थिती वाढविण्याच्या अटीवर सदर मान्यता देण्यात येत आहे.

**शिक्षणाधिकारी (प्राथमिक)**
**पुणे जिल्हा परिषद, पुणे**

**प्रत :- माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना**

१. **सचिव / अध्यक्ष-** श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था (शिवनेर) प्राथमिक विदया मंदीर बारव ता. जुन्नर, जिल्हा पुणे